Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 650 – 653
DOI: 10.5281/zenodo.10279044

**Original Research Article**

# महात्मा गांधी यांच्या विचारांची वर्तमान प्रासंगिकता

प्रा. पुरुषोत्तम रंगराव चाटे

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय मोताळा, जि. बुलढाणा ४४३१०३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: prushottamchate786@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

"महात्मा म्हटला गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणी चालू नये. महात्मा कोण हे आपल्याला माहित नाही, म्हणून चांगला मार्ग हा की महात्म्याचे वचन देखील बुद्धीच्या कसोटीवर तपासून घ्यावे आणि ते सकस न उतरल्यास त्याचा त्याग करावा."ज्यांची जयंती जागतिक अहिंसा दिवस म्हणून साजरी करण्याचा निर्णय संयुक्त राष्ट्र संघाने घेतला आहे. भारताला नव्हे तर संपूर्ण जगाला सत्य आणि अहिंसा या तत्त्वावर राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण करण्याचा मंत्र त्यांच्या मुळे मिळाला. महात्मा गांधीनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लाखों भारतीयांना शांततापूर्व संघर्षाची प्रेरणा त्यांच्या विचार व नेतृत्वामुळे मिळाली. गांधीच्या कार्याचा प्रभाव भारतापुरचा मर्यादित न राहता जागतिक पातळीवर त्यांची दखल घेतली जाते. भारतावर विविध परकीय राजवटींचे राज्य होते. त्यामध्ये ब्रिटिश राजवटीचा जास्त उल्लेख भारताच्या जडणघडणी त असल्याची नोंद आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर नियोजनाचा आधार घेऊन समाजवादी समाज रचनेच्या व्याहूरचनेखाली विकास करण्याचा मार्ग अवलंबला. कारण पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर रशियन राज्यव्यवस्थेचा प्रभाव होता आणि त्यामुळे रशियामध्ये समाजवादी शासन व्यवस्था असल्यामुळे भारताने सुद्धा याच व्यवस्थेचा पुरस्कार केला. त्यामध्ये सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, गरिबी हटाव, कृषी अनुदान आणि लघु आणि कुटीर उद्योगाला चालना, वंचित घटकांसाठी विविध सरकारी योजना व सार्वजनिक क्षेत्राचे सबलीकरण इत्यादी घटकांचा विचार समाजवादी समाज रचनेमध्ये करणे अभिप्रेत होते. मात्र १९८० च्या दशकानंतर वरील धोरणाची दिशा बदलण्यास प्रारंभ झाला. भारताची सर्व आघाड्यावर होत असलेली पीछेहाट वाढते कर्ज, महागाई, बेरोजगारी तसेच रुपयाचे घसरते मूल्य या मधून मार्ग काढण्यासाठी नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला. १९९०-९१ ला भारताने समाजवादी समाज रचनेचा त्याग करून भांडवलवादी अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरू केली. यामध्ये खाऊजा धोरणाचा स्वीकार केला त्यामध्ये खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरण अशा त्रिसूत्रीचा स्वीकार करण्यात आला. आज या धोरणाची अंमलबजावणी होऊन ३२ वर्ष पूर्ण झाली आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे सर्वच स्तरातील संदर्भ बदलले आहे.

प्रामुख्याने वापरा आणि फेकून द्या, बेरोजगारी, भ्रष्टाचार, नैतिक अध:पतन,अमर्याद उपभोग आणि अविश्वास, पर्यावरणाची हानी यासारख्या असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत. या बदलाच्या संदर्भात महात्मा गांधीजींचे धोरण उपयोगी पडते काय या प्रश्नाची उकल करण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधात वेध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कारण महात्मा गांधींनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर "पश्चिमेचे वारे आडवा" अशा आशयाचे विधान केले होते, त्या पाठीमागे कदाचित त्यांचा हा गर्भित इशारा असावा असे वाटते. श्रमाचे शोषण होता कामा नये.निर्मिकाने प्रत्येकाला आपली भाकरी निढळाच्या घामाने मिळवून खायाचे सांगितले आहे.त्यामुळे जगासाठी गांधीजीचे तत्वज्ञान तरणोपाय आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**संशोधनाचा उद्देश**

१. महात्मा गांधी यांच्या विचाराची वर्तमानकलीन प्रासंगीकता तपासणे.
२. महात्मा गांधी यांच्या कार्याला उजाळा देणे.

**जागतिकीकरण**

०१ जानेवारी १९९५ रोजी भारताने जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर स्वाक्षरी केली. त्यामुळे भारत जागतिक घडामोडीशी जोडला गेला.भारतीय सीमारेषेमध्ये परकीय कंपन्या परकीय गुंतवणूक, परकीय उत्पादने व परकीय सेवा इत्यादी बावीचा प्रभाव वाढला.बहुराष्ट्रीय कंपन्यासोबत स्पर्धा करणे देशी उद्योगांना आणि विशेष करून लघुकटीर उद्योगांना अवघड बनले होते. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा स्पर्धेच्या रेट्यात उत्पादन वेग तसेच उच्च कोटीचे तंत्रज्ञान व उत्पादनाचा दर्जा भारतीय उत्पादनापेक्षा सरस आणि किंमतही कमी त्याचा परिणाम भारतीय मालाला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही किंवा भारतीय मालाची निर्यातीच्या स्पर्धेमध्ये पीछेहाट झालेली दिसते. दुसऱ्या बाजूला भारताला आयातीचा सामना करावा लागतो जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापारविषयक तरतुदीमुळे भारताला परदेशी आयात निर्यातीवर संख्यात्मक आणि गुणात्मक निर्बंध लावण्यावर मर्यादा आल्या. याचच अर्थ भारतातील लघु आणि कुटिर उद्योगाला फारसे भविष्य दिसत नाही. या परिस्थितीमध्ये महात्मा गांधी यांनी सुचविलेले स्वदेशी व लघु-कुटीर उद्योग विषयक धोरण उपयोगी पडते. स्वदेशीच्या धोरणामुळे भारतीय उत्पादनाची मागणी वाढण्यास मदत होईल त्याचबरोबर खादीच्या आणि स्वदेशी वस्तू वापराच्या आग्रहामुळे भौतिक वादावरील अवलंबित्व, अनावश्यक आयात कमी होऊन व्यापारातील प्रतिकूलता कमी होण्यास मदत होईल.

**ग्रामीण अर्थव्यवस्था**

महात्मा गांधी यांनी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता.कारण भारत हा कृषिप्रधान देश आहे या देशांमध्ये साडेसहा लाख खेडी आहेत जोपर्यंत खेडी स्वयंपूर्ण आणि समृद्ध होणार नाहीत तोपर्यंत भारत महासत्ता होऊ शकत नाही. हे सांगण्यासाठी कोणत्याही तत्ववेत्याची गरज नाही.त्यामुळे वर्तमान परिस्थितीमध्ये ५५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते व ४५ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते.शहरी वस्तीत लोकांच्या गर्दीमुळे अनारोग्य, अस्वच्छत्ता, प्रदूषण यामुळे हैराण आहे, तर खेडी ओस पडत चाललेली आहे.या विदारक स्थितीमध्ये मार्ग काढण्यासाठी महात्मा गांधीजींनी ग्राम स्वराज्याची सांगितलेली संकल्पना लागू पडते.त्यांच्या मतानुसार पूर्वी गावातील कारभार गावातील लोकांच्या सल्ल्याने चालायचा परंतु इंग्रजी राजवटीमध्ये आपल्या स्वार्थासाठी खेड्यामधील शासन व्यवस्था संपुष्टात आणली आणि खेड्यातील जनता परावलंबी झाली. गांधीजींच्या मते प्रत्येक खेड्यात उत्पादन,वितरण व उपभोग या गोष्टी घडल्या पाहिजेत म्हणजेच प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण होईल.गांधीच्या ग्रामोधाराच्या प्रक्रियेमुळे खेड्यात नव विचारांचे वारे जोरात वाहू लागेल, येथे आरोग्य, शिक्षण,स्वच्छता व स्वावलंबन या गोष्टीला चालना मिळेल. खेड्यातील लोकांचा व त्यांच्या गरजांचा गांधीजींनी सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यांच्यामते ग्राम जर आदर्श बनायचे असेल तर तेथील लोकांनी कामाचे नीट नियोजन केले पाहिजेत,लोकांनी शेतात पिके घेताना नगदी पिकांचा पहिल्यांदा विचार करावा. शेती हा खेड्यातील

लोकांचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे येथील लोकांनी बारोमास काम मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी यायची जेव्हा ही समस्या त्यांच्या लक्षात आली तेव्हा त्यांनी फावल्या वेळात सूतकताई,चरखा चालविणे इत्यादी प्रकार खेड्यात रूढ केले.शेतीतील कापूस त्यापासून सूत काढणे व त्यापासून कापड तयार करणे सुरू झाले. त्यांनीच खादीला प्रतिष्ठा मिळवून दिली.

**शैक्षणिक विचार**

मुळात शिक्षण हे समाज परिवर्तनाचे उत्तम माध्यम आहे.कोणत्याही राष्ट्राचा विकास अथवा विनाश करायचा तर त्यासाठी शिक्षणासारखे शस्त्र नाही.शिक्षणाचा मूळ उद्देश मनुष्याचा सर्वांगीण विकास करणे होय.केवळ पुस्तकी किडा न होता व्यवहार ज्ञानही मनुष्याला शिक्षणातून प्राप्त व्हावे असे गांधीजींना वाटायचे.मातृभाषेतून शिक्षण देण्यात यावे यावर त्यांचा जोर होता.कारकूनी शिक्षण पद्धती बदलून त्या जागी मूलउद्योगी शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करून नई तालीम हे शिक्षण सुरू केले.शिक्षण क्षेत्रातून व्यवसाय शिक्षण देऊन मुलांमध्ये संपूर्ण माणूस तयार करणे आणि स्वावलंबी होऊन शारीरिक कार्य करून आपला उदरनिर्वाह चालवावा अशी गांधीजीचे विचार होते. वर्तमान परिस्थितीमध्ये शिक्षणाचे जे काही हाल झाले आहेत त्यावरून स्पष्टपणे असेल दिसून येते की समकालीन परिस्थितीमध्ये महात्मा गांधी यांनी सांगितलेला थ्री एच फार्मूला अत्यंत फलदायी ठरतो. कारण आज पारंपारिक अथवा व्यावसायिक शिक्षण घेऊन रोजगारीचा प्रश्न निर्माण झालेला आहे.त्यामुळे महात्मा गांधींनी सांगितलेली नई तालीम किंवा थ्री एच चा सूत्र प्रमाणे शिक्षण मातृभाषेतून देण्याचे प्रयोजन नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात येत आहे.

**श्रमाविषयी विचार**

आराम हराम आहे असे गांधीजी म्हणत मेहनत मजुरी करावी,कष्ट करावे व स्वतःचे व देशाचे स्वास्थ्य सुस्थित ठेवावे याकरिता दररोज एक तास श्रमदान मनुष्यांनी करावे असे गांधीजीचे मत होते.वर्तमान परिस्थितीचा आढावा घेतला तर जगामध्ये भारत सर्वात जास्त तरुण लोकसंख्या असणारा देश आहे. मात्र या तरुणाईला विधायक कार्याकडे वळविण्यासाठी आवश्यक असणारे धोरण आज सुद्धा शासनाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे ही तरुण युवाशक्ती व त्यांची ऊर्जा व्यर्थ जाण्याची भीती निर्माण झाली आहे.आज देशात एकूण बेरोजगरीच्या तीन पट बेरोजगारी उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांमध्ये आहे. महात्मा गांधी यांच्या मते प्रत्येकाने श्रम करावे आणि श्रम करूनच उदरनिर्वाह भागवावा.

**आर्थिक विचार**

आपल्या देशामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये आर्थिक विषमता आहे.जगात ६२ लोकांकडे ५०% संपत्ती आहे,त्यामध्ये ६ जन भारतीय आहे.तर भारत देशातील ०३ टक्के जनतेकडे एकूण संपत्तीच्या ८० टक्के संपत्ती आहे व उर्वरित जनतेकडे २० टक्के संपत्ती आहे यावरून श्रीमंत अधिक श्रीमंत गरीब अधिक गरीब बनत जात आहे. महात्मा गांधी यांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये आर्थिक समानतेवर भाष्य केलेले आहे.त्यांच्या मते प्रत्येक मनुष्याने आपल्या गरजा मर्यादित ठेवाव्या आणि आपला उदरनिर्वाह चालवावा, आपल्या संपत्तीचा उपयोग मनुष्याने लोककल्याणकरिता केला पाहिजे प्रत्येकाने आपल्या उत्पन्नाची एक सीमा ठरून उर्वरित संपत्ती दान करावी त्यामुळे समाजातील विषमता नष्ट होईल असा त्यांचा विश्वास होता.

**चिरस्थायी विकास**

भारतामध्ये विकासासाठी अनेक विकास योजना राबविण्यात आल्या.सर्व विकास योजनांची शिडी बनवून आपण केव्हाच चंद्रावर पाऊल ठेवले असते. आज सुद्धा भारताच्या अनेक भागांमध्ये प्रादेशिक असमतोल,आर्थिक विषमता, नैसर्गिक साधन संपत्तीची लूट, अविवेकी उत्पादन व उपभोग प्रवृत्तीमुळे विविध प्रकारच्या प्रदूषणात वाढ झाली. त्यामध्ये जल, जंगल, जमीन या सर्वांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. त्यामुळे ११ व १२ व्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक

वृद्धीसह विकास साधने या तत्वाचा स्वीकार केला. त्याचबरोबर पंचवार्षिक योजनेनंतर नव्याने अस्तित्वात आलेल्या नीती आयोगाने देखील याच बाबीची दखल घेतली. यावरून असे सिद्ध करता येते की उत्पादन करण्यासाठी महात्मा गांधी यांनी मांडलेले पर्यावरण विषयक धोरण अंगीकारून उत्पादन करणे आवश्यक ठरते. गांधीजीचे विचार चिरस्थायी विकासाला पूरक असल्याचे दिसते महात्मा गांधी नेहमी म्हणायचे "पृथ्वी सर्वांची गरज भागविते परंतु कुणा एकाची हाव भागवू शकत नाही".

**सारांश**

भारताला वर्तमान परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी समाधानकारक उपाय म्हणून गांधीजींच्या विचाराचा आणि मूल्यांचा आधार घेणे गरजेचे वाटते. कारण भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि नैतिक परिस्थिती फार समाधानकारक नाही. आज दारिद्य्र, पर्यावरण, भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, परकीयांवरील अवलंबित्व अविवेकी औद्योगिक धोरण, नैसर्गिक साधन संपत्तीचे शोषण, प्रदूषण इत्यादी असंख्य समस्यांवर प्रभावी उपाययोजनासाठी गांधीजीच्या तत्वज्ञानांची आवश्यकता आहे.त्याचबरोबर समाज व राष्ट्राच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण होतील अशा बिकट परिस्थितीत महात्मा गांधींच्या विचारांची धोरणांची प्रासंगिकता वाढते यात शंका नाही. महात्मा गांधींच्या विचारांची आवश्कता भारतासह जगातील सर्व राष्ट्रांना आहे.कारण जग बुद्ध आणि युद्ध आशाच टोकावर पोहचलेले आहे, यात आपल्याला जर बुद्ध पाहिजे तर गांधीजीची विचारसरणी शिवाय भारताला व जगाला पर्याय नाही.कारण अल्बर्ट आईन्स्टाईन असं म्हणतो की महात्मा गांधी सारखा महान मानव या भूतलावावर होऊन गेला यावर भावी पिढ्यांचा विश्वास बसणार नाही.त्यामुळे वर्तमान परिस्थितीत महात्मा गांधीच्या विचारांची गरज आहे.

**संदर्भग्रंथ**


१. मो. क. गांधी – माझे सत्याचे प्रयोग, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद – २०११ पृ.१४

२. ब्रिजमोहन हेडा – महात्मा गांधींचे विचार, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद – २०१० पृ.७९

३. प्राचार्य प्रभाकर वीरकर – उदयोन्मुख भारतीय समाजाचे शिक्षण व शिक्षक, पुणे

४. अण्णा हजारे – ग्रामविकासाची पाऊलवाट, श्री यादबाबा प्रकाशन, राळेगणसिद्धी – १९९८ पृ.५३

५. डॉ. रामेश्वर भिसे – संपादक Relevance of Mahatma Gandhi's Ideology in Present Scenario – प्रशांत प्रकाशन जळगाव – २०१२ पृ.३६५,४१७,

६. लोकसत्ता पेपर ०१ ऑक्टो. २०२३ – लोकरंग

७. इंटरनेट संकेतस्थळ